# University of Mumbai

परीक्षा नियंत्रकांचे कार्यालय
म.जो. फुले भवन,
विद्यानगरी, कालिना.

क्र. परीक्षा/प.नि./९८ /२०१२

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान शाखा, मान्यताप्राप्त संस्थांचे प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांकरीता केंद्र प्रमुख (Chief Conductor) म्हणून महाविदयालयाच्या प्राचार्यानी काम करणे विद्यापीठ परिपत्रक क्र. Exam./Um/1331, दि. १४ जानेवारी, २००५ नुसार आवश्यक आहे, हे आपल्या पुन्हा एकदा निदर्शनास आणून देण्यात येत आहे. तरी वरील संदर्भित परिपत्रकाचे अवलोकन करावे.

तसेच संस्था/महाविद्यालय/ विद्यापीठाचे पद्व्युत्तर विभाग यांचे संचालक/प्राचार्य/विभागप्रमुख यांच्याऐवजी इतर ज्येष्ठ प्राध्यापक उपरोक्त हे काम करणार असेल, तर त्यासाठी विद्यापीठाची पूर्वपरवानगी वरील संदर्भाधीन परिपत्रकानुसार घेणे आवश्यक आहे, याचीही नोंद घ्यावी.

विद्यापीठाच्या विविध परीक्षांसंबंधी महाविद्यालय स्तरावरील कामे कार्यक्षमपणे व वेळेवर पूर्ण करण्याचे आपल्याकडून सहकार्य अपेक्षित आहे. तसेच या सर्व कामांमध्ये बिनचूकपणा व ती कार्यक्षमपणे होण्यासाठी आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. यासंबंधी काही अडचणी वा समस्या असल्यास वेळीच परीक्षा विभागाच्या निदर्शनास आणाव्यात, म्हणजे उचित कार्यवाही करणे सोईचे होईल.

तरी याबाबत गंभीर दखल घेऊन उचित कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

(डॉ. एस. एम. सुर्यवंशी)
प्रभारी परीक्षा नियंत्रक

मुंबई - ४०००९८
दि. ११ एप्रिल, २०१२